# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई – ४००००५.
**दूरध्वनी :** ०२२ – २२१६ ३९६४ / ६५ / ६९ **फॅक्स :** ०२२–२२१६ ३९७६
**ई–मेल :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
**संकेतस्थळ :** www.mercindia.org.in / www.merc.gov.in

जाहिरात क्र. १०/२०१६–१७

## जाहीर सूचना

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा – ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) (पहिली सुधारणा) विनियम, २०१६ वर अभिप्राय मागविण्याबाबत**

मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. (जीईपीएल), हे प्लॉट क्र. आयटी–५, ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा – ठाणे, येथील ११.७४ हेक्टर्सच्या अधिसूचित केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राचे (एसईझेड) विकासक आहेत आणि विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ नुसार त्या एसईझेड क्षेत्रामधील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्याकरीता वितरण यंत्रणेचे संचालन आणि देखभाल करण्यासाठी ते मानीव वितरण परवानाधारक आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा – ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१५' ('मुख्य विनियम'), दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी अधिसूचित केले आहेत.

भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय (वाणिज्यिक विभाग) यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०१५ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेच्या अनुषंगाने, जीईपीएलचे परवाना क्षेत्र, त्यामध्ये ऐरोली गावाच्या सर्व्हे क्र. १४५ (हिस्सा) येथील १.१७० हेक्टर्सच्या अतिरिक्त क्षेत्राची भर पडल्यामुळे, ११.७४ हेक्टर्स वरुन १२.९१ हेक्टर्सपर्यंत सुधारित झाले आहे. आयोगाने दिनांक ६ डिसेंबर, २०१६ च्या आदेशान्वये पुरवठ्याच्या सदर क्षेत्रातील बदलास तत्वत: परवानगी दिली आहे.

आयोगाने, त्यानुसार पुरवठ्याच्या क्षेत्रात बदल करण्यासाठी मुख्य विनियमांमध्ये मर्यादित सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे. सुधारणेचे प्रारुप आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेत स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. या प्रारुप सुधारणा विनियमांवर अभिप्राय, सूचना किंवा हरकती इंग्रजी किंवा मराठीमध्ये, सहा (१+५) प्रतींमध्ये, **आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४०० ००५,** येथे व्यक्तिश: किंवा पोस्टाने; किंवा ई–मेल किंवा फॅक्स (फॅक्स क्र.: ०२२–२२१६३९७६, ई–मेल : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in) द्वारा **दि. २० जानेवारी, २०१७** पर्यंत कृपया पाठविण्यात याव्यात. या दिनांकापर्यंत प्राप्त झालेल्या प्रतिक्रिया आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

**दिनांक : १९ डिसेंबर, २०१६** **सचिव**

**ठिकाण : मुंबई** **महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**